ISSN 2277-5730
Valume-VI
Issue-II
April-June-2017

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Ajanta Prakashan

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

VOLUME - VI ISSUE - II APRIL - JUNE - 2017 AURANGABAD

***Peer Reviewed Referred and UGC Listed Journal***

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

| IMPACT FACTOR / INDEXING |
|---|
| 2016 - 4.205 |
| www.sjifactor.com |

✦ EDITOR ✦

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**

M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

✦ PUBLISHED BY ✦

**Ajanta Prakashan**
**Aurangabad. (M.S.)**

## MARATHI


| | | | |
|---|---|---|---|
| १ | डॉ. शुभांगी डी. राठी<br>डॉ. राजेंद्र एस. नाडेकर | जळगाव जिल्हा पंचायतराजमधील अनुसूचित जाती-जमातीच्या राजकीय नेतृत्वाच्या शैक्षणिक स्थितीचे अध्ययन | १-७ |
| २ | प्रा. डॉ. संजय शिंदे | महात्मा ज्योतीराव फुले यांचे मराठी साहित्याला योगदान | ८-१५ |
| ३ | प्रा. डॉ. सर्जेराव गंगाधर गोल्डे | भारतातील नवीन कर रचना – वस्तु व सेवा कर | १६-१९ |
| ४ | डॉ. स्मिता शिंदे | वसाहतवादी इतिहास लेखनाचे मूल्यमापन | २०-२४ |
| ५ | श्री. वाय. एम. कुलकर्णी<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी | श्रीमद्‌भगवद्‌गीतेचे तात्पर्य | २५-२८ |
| ६ | पठाण मगबूलखान इस्माईलखान | ग्रामीण विकासात ग्रामपंचायतीची भूमिका | २९-३२ |
| ७ | विलास धोंडीराम सिनगारे | मराठी माध्यमिक शाळांतील शिक्षकांच्या समस्या व उपाययोजना | ३३-४० |
| ८ | शिवप्रसाद मीननाथ घोडके | वारकरी संप्रदायाविषयी | ४१-४४ |
| ९ | डॉ. राजू भागाजी वनारसे<br>डॉ. सत्यपाल हरिभाऊ कांबळे | भारतीय राजकीय संस्कृतितील विविधता आणि बदलते संदर्भ | ४५-५२ |
| १० | प्रा.डॉ.गोवर्धन बजरंग लांब | अनूसूचीत जमातीच्या समस्या | ५३-५५ |
| ११ | सारिका विष्णूदास मोहिते | रविंद्र शोभणे यांच्या पांढर कादंबरीतील दुष्काळ | ५६-५९ |
| १२ | प्रा. डॉ. फड कालिदास दिनकर | महिला सबलीकरण | ६०-६२ |
| १३ | डॉ. बाळासाहेब बाबुराव लिहिणार | दलित साहित्याचे प्रेरणास्थान: एक आढावा | ६३-६६ |
| १४ | प्रा. पूर्णिमा सीताराम वानखेडे | जागतिक महामंदी त्यांचे स्वरुप आणि परिणाम | ६७-७० |
| १५ | प्रा. डॉ. विष्णु बब्रुवान वाघमारे | कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे धार्मिक योगदान | ७१-७५ |
| १६ | डॉ. नवनाथ दणाणे | २० व्या शतकाअखेरची दलीत कविता | ७६-८० |
| १७ | प्रा. वसंत यशवंत गावडे | मा. शरदरावजी पवारसाहेब यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान | ८१-८४ |
| १८ | डॉ. के. के. मालू | महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारांची प्रासंगिकता | ८५-९० |

१६

# २० व्या शतकाअखेरची दलीत कविता

**डॉ. नवनाथ दणाणे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख, श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी.

'२० व्या शतका अखेरच्या दलित कवितेचा विचार करताना साधारणपणे नव्वदपूर्व दलित कवितेची पार्श्वभूमी लक्षात घेणेही आवश्यक ठरते. दलित कवितेला प्रदिर्घ अशी परंपरा आहे. किसन फागूजी बनसोडे, गोपाळ बाबा वलंगकर, वामनदादा कर्डक, अण्णाभाऊ साठे, या पहिल्या पिढीतील शाहीर कवींपासून ते स्वातंत्र्योत्तर कालखंडातील पहिल्या पिढीतील बाबुराव बागूल,वामन निंबाळकर,नामदेव ढसाळ,यशवंत मनोहर, दया पवार,अर्जुन डांगळे, रविचंद्र हडसनकर, केशव मेश्राम,अशा अनेक कवींच्या कवितेने दलित कवितेला सर्वोच स्थान प्राप्त करुन दिले आहे. दुस-या पिढीतील प्रकाश जाधव,भाऊ पंचभाई,लोकनाथ यशवंत, अरुण काळे, ज्योती लांजेवार, प्रज्ञा लोखंडे, उषाकिरण अंभोरे,मीना गजभिये, उल्हासिनी कांबळे, फ.म. शहाजिंदे यांच्या कवितेने ही परंपरा अधिक समृध्द केली आहे.

मराठी साहित्य विश्वामध्ये दलित साहित्याचा प्रवाह निर्माण होऊन जवळपास पाच दशके उलटून गेली आहेत. सत्तरच्या दशकामध्ये दलित कविता ख-या अर्थाने आपले सामर्थ्य अधोरेखित करताना दिसते. ऐंशी,नव्वदच्या दशकात ही कविता अधिकच बहरलेली दिसते. सुरुवातीला वेदना, नकार प्रकट करणारी ही कविता पुढे प्रचंड प्रमाणात विद्रोह व्यक्त करु लागली. १९८० ते २००० या वीस वर्षाच्या कालखंडातील दलित कविताही त्यास अपवाद नाही. शतकाअखेरच्या कवितेवर काही प्रमाणात उदारीकरण व जागतिकरणाचा प्रभाव व परिणाम झालेला असला तरीही, ती आपली सत्व व सामाजिक अस्मिता टिकवून आहे. तिच्यातील वेदनेचा हुंकार व नकार, विद्रोहाची तीव्रता तितकीच प्रखर आहे.

२० व्या शतकाअखेरच्या दलित काव्यसंग्रहाची यादी मोठी असली तरी पुढील कविता संग्रहांचा उल्लेख महत्वपूर्ण ठरतो. त्यामध्ये प्रामुख्याने भुजंग यांचा 'उलगुलान' मेश्राम यांचा अरुण काळे यांचा रॉकगार्डन व 'नंतर आलेले लोक' लोकनाथ यशवंत यांचा 'आणि शेवटी काय झाले' लहु कानडे यांचा 'क्रांतीपर्व,' माधव सरकुंडे यांचा 'मनोगत', प्रतिमा राजानंद सुरडकर यांचा 'मला हवी असणारी पहाट' महेंद्र भवरे यांचा 'चिंताक्रांत मुलखाचे रुदन', सुरेश साबळे यांनी संपादीत केलेला 'युगाचे हुंदके' हा समकालिन दलित कवियीत्रींचा प्रातिनिधीक कविता संग्रहही महत्वपूर्ण आहे.

शतका अखेरच्या दलित कवींची कविता ही लक्षवेधी ठरताना दिसते. त्यामध्ये प्रामुख्याने अविनाश गायकवाड यांचा 'जंजाळ' ,राम दातोंडे यांचा 'गल्ली बदललेला मोर्चा', उत्तम अंभोरे यांचा 'पत्ता बदलत जाणारा गनीम',बाबुराव बागूल यांचा 'वेदाआधी तू होतास', डी.बी. जगापुरिया यांचा 'ठिणगी,' लोकनाथ यशवंत यांचा 'आता होवून जाऊ द्या', सुरेखा भगत यांचा 'साक्ष', दिनेश लखमापरकर यांचा 'झाड बोलत आहे', ना.तु.पोघे यांचा 'आणि सुर्य उगवला' , भगवान भोईर यांचा 'उन्हातल झाड', प्रल्हाद

स्त्रीवादी आकलनही तितक्याच प्रखरपणे मांडताना दिसते. आईची प्रतिमा चित्रित करीत असताना आई विषयीची कृतज्ञता व्यक्त करतानाच, आपले सामाजिक भान व देशाभिमान तितक्याच प्रखरपणे मांडताना दिसते. ' अजून वादळ उठले नाही' या कविता संग्रहामध्ये ज्योती लांजेवार ही कवयित्री म्हणते,

" आई! तुझा लक्तरलेला पदर मला
राष्ट्रध्वजाइतका प्रिय वाटतो
तुझ्या कपाळावरील कुंकवात
अशोकचक्राचा भास होतो.
.....तुझ्या चेह-यावरच्या सुरकुत्यात
देशाचे संविधान दिसते.
तुझ्या डोळयातल्या बुबळखाचात
देशाची संसद दिसते"[९]

सामाजिक आशयाच्या बाबतील दलित कविता अत्यंत परिपक्व झालेली दिसते. आईच्या दु:ख व दारिद्रयाची लक्तरे कवेत घेतानाच, ही कविता आपला देशाभिमान अजिबात ढळू देत नाही.थोडक्यात २० व्या शतकाच्या अखेरच्या दलित कवितेचे स्वरुप व वास्तव हे संस्कृती मूल्यमापना बरोबरच समकालीन सामाजिक संदर्भ व्यक्त करणारे आहे. आत्मभान, आत्मजागृती, अस्मिता व वेचारिक बांधिलकी मानणारी ही कविता, एकंदर मराठी कवितेमध्ये मोलाची भर टाकणारी आहे.

**संदर्भ**


१. पानतावणे गंगाधर : 'आंबेडकरी जाणिवांची आत्मप्रत्ययी कविता' गोदाप्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती, जानेवारी २०१० पृ.२ (मनोगत)

२. तत्रैव : पृ.१५७

३. भवरे महेंद्र : ' दलित कवितेतील नवे प्रवाह' शब्दालय प्रकाशान,श्रीरामपूर, प्रथमावृत्ती,फेबु.२००१

४. जगताप वामन : प्रतिबिंब (काव्यसंग्रह) अनुदिप प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती, १४ जानेवारी २००१ पृ.६९

५. काळे अरुण : 'नंतर आलेले लोक' (कविता संग्रह) लोकवाङ:मय गृह प्रकाशन, पाचवी आवृत्ती, सप्टें.२००८ पृ.६

६. मनोहर यशवंत : ' आंबेडकरीवादी मराठी साहित्य' भीमरत्न प्रकाशन,नागपूर, प्रथमावृत्ती, ऑक्टोबर १९९९ पृ.२३०

७. पाटील भास्कर : ' मराठी कवितेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर' चिन्मय प्रकाशन, औरगांबाद. पृ.१०५

८. मनोहर यशवंत : उनि,पृ.२१४

९. लांजेवार ज्योती : 'अजून वादळ उठले नाही' (कवितासंग्रह) क्रांतीपर्व प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, ऑक्टो २०००, पृ.९




## CONTACT FOR SUBSCRIPTION

**AJANTA**

**ISO 9001: 2008 QMS/ISBN/ISSN**

**Vinay S. Hatole**

**Jaisingpura, Near University Gate, Aurangabad (M.S) 431 004,**

**Cell : 9822620877, 9579260877 Ph: 0240 - 2400877**

**E-mail : ajanta1977@gmail.com**

**Website : www.ajantaprakasha.com**